CMYK


**हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग; महाराष्ट्राची भाग्यरेषा**
>> पान 2

**सीएनजी कारने घेतला अचानक पेट, कार जळून खाक**
>> पान 3

**शेतकऱ्यांच्या आत्महत्येच प्रमुख कारण पाणी टंचाई आहे : केंद्रीय मंत्री गडकरी**
>> पान 4


**सुविचार**

जीवनातील प्रत्येक क्षण आनंदाने जगा.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 268 ■ सोमवार, दि. 09 जून 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006





**'सितारे जमीन पर'च्या रिलीजबाबत आमिर खाननं घेतला मोठा निर्णय, ऐकला अमिताभ बच्चन यांचा सल्ला!**

आतील पान

## काऊंटडाऊन सुरू! वर्धापनदिनीच राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र येणार? दादांच्या खास नेत्याचं सूचक विधान

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र येणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत. त्याबाबतची सूचक वक्तव्यंही दोन्ही गटाच्या नेत्यांकडून केली जात आहे. दरम्यान आता दोन्ही गटाच्या एकत्र येण्याबाबत सर्वात मोठी अपडेट समोर आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या वर्धापनदिनीच दोन्ही गट एकत्र येतील, असं बोललं जातंय. याबाबतचं सूचक वक्तव्य अजित पवार गटाचे प्रवक्ते अमोल मिटकरी यांनी केलं आहे. त्यामुळे येत्या दोन दिवसांत महाराष्ट्राच्या राजकारणात आणखी एक भूकंप होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र येण्याबाबत विचारलं असता अमोल मिटकरी यांनी दहा जूनपर्यंत वाट बघावी, असं वक्तव्य केलं आहे. तसेच पांडुरंगाची इच्छा असेल, तर लवकरच ताई-दादा एकत्र येतील, असंही मिटकरींनी म्हटलं आहे. मिटकरींच्या या वक्तव्यानंतर राष्ट्रवादीच्या वर्धापनदिनीच दोन्ही गट एकत्र येऊ शकतात, अशा शक्यता वर्तवल्या जातायत. दरम्यान, शरद पवार गटाचे नेते प्रशांत जगताप यांनी असा कोणताही प्रस्ताव दिला नसेल, असं वक्तव्य केलंय. यामुळे राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांत नेमकं काय शिजतंय, याबाबत संभ्रम निर्माण होताना दिसत आहे.



अमोल मिटकरी नेमकं काय म्हणाले?

अजित पवार आणि सुप्रिया सुळे एकत्र येतील का? असा प्रश्न विचारला असता अमोल मिटकरी म्हणाले, ''पांडुरंगाची इच्छा असेल तर आषाढी एकादशीपर्यंत ताई दादा एकत्र येतील. अजून तसा काही प्रस्ताव आल्याचं कळलं नाही. पण दहा तारखेला पक्षाचा मेळावा पुण्याला होतोय. त्यामुळे दहा तारखेपर्यंत आपण वाट पाहावी. दोघांनी एकत्र येण्यासाठी कुणाचा विरोध असण्याचं काहीही कारण नाही. शरद पवार ज्येष्ठ नेते आहेत. ते आमचे मार्गदर्शक आहेत. पवारसाहेब, दादा आम्हाला जो काही आदेश देतील, तो आदेश अंतिम मानून आम्ही पुढे जाऊ. पांडुरंगाच्या मनात जे असेल तेच होईल. आषाढी एकादशीचा कशाला, कुठलाही मुहूर्त असू शकतो, पण तूर्तास तसा प्रस्ताव नाही.''

अजित पवारांसोबत जाण्याबाबत सुप्रिया सुळेंना विचारलं असता त्यांनी सूचक प्रतिक्रिया दिली. शरद पवारांच्या कामाची पद्धत आपण सगळ्यांनी सहा दशकांपासून पाहिली आहे. पवारसाहेब जो काही निर्णय घेतात, जे काही मार्गदर्शन करतात. ते लोकशाही पद्धतीनेच होत असतं. त्यामुळे जो काही निर्णय असेल, तो शेवटच्या कार्यकर्त्याला विश्वासात घेऊनच घेतला जाईल. एका बाजुने आम्ही आजपर्यंत कुठलाही निर्णय घेतला नाही आणि घेणारही नाही, असं सुप्रिया सुळेंनी म्हटलं.

## मद्यधुंद पोलीस कर्मचाऱ्याची भर चौकात एका इसमाला मारहाण; व्हिडिओ समाज माध्यमावर व्हायरल, पोलीस निलंबित

**गोंदिया/प्रतिनिधी :** गोंदिया जिल्ह्यातून एक खळबळजनक बातमी समोर आली आहे. यात चक्क पोलीस कर्मचाऱ्याने छत्तीसगढ राज्यातील एका इसमाला बेदम मारहाण केल्याची घटना गोंदिया जिल्ह्यात उघडकीस आली आहे. गोंदिया जिल्ह्यातील डूग्गीपार पोलीस स्टेशनमध्ये कार्यरत असलेला कांचन राहुले हा पोलीस कर्मचारी रस्त्याने जात असताना छत्तीसगड राज्यातील सुनीतकुमार मडावी याने कट मारून ओव्हरटेक केल्याच्या आरोप केलाय.

पोलिसांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह

दरम्यान, याच कारणावरून पोलीस कर्मचारी कांचन राहुले याने सुनीतकुमार मडावीला जबर मारहाण केली. ही घटना १९ मे २०२५ रोजी घडली. त्यानंतर सुनीतकुमार मडावी याने पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती. यावर गोंदिया पोलिसांनी संबंधित पोलिसावर कारवाईचा बडगा उगारत निलंबित केलं असून सदर पोलीस कर्मचारी मद्यधुंद अवस्थेत असल्याची माहिती देखील पोलिसांच्या तपासात समोर आली आहे. त्यामुळे पोलिसांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण करण्यात येत आहेत.

तर दुसरीकडे, पोलीस कर्मचाऱ्याने मला चुकीच्या पद्धतीने मारहाण केली आणि आता हा व्हिडिओ समाज माध्यमावर व्हायरल झाल्यामुळे माझी प्रतिष्ठा समाजामध्ये मलीन झाल्याचा आरोप करीत संबंधित कर्मचाऱ्याला नोकरीतून बडतर्फ करावं, अशी मागणी सुनीतकुमार मडावी याने पोलीस विभागाकडे केली आहे.

## झोपलेल्या व्यक्तीला दगडाने ठेचलं

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** नवी मुंबईच्या बेलापूर परिसरात एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. इथं एका विकृताने झोपलेल्या व्यक्तीच्या डोक्यात दगड घालून हत्या केली आहे. भल्या पहाटे बेलापूरच्या शहाबाद गावात ही घटना घडली. आरोपी हत्या करत असताना काही स्थानिकांनी त्याला पाहिलं. त्यांनी आरोपीला बेदम मारहाण करत पोलिसांच्या हवाली केलं आहे. अशाप्रकारे झोपलेल्या व्यक्तीची ठेचून हत्या झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

प्रकाश लोखंडे असं हत्या झालेल्या ६० वर्षीय व्यक्तीचं नाव आहे. ते बेलापूरच्या शहाबाद येथील रहिवासी आहेत. ते नेहमी येथील एका ब्रिजखाली झोपायला जायचे. शनिवारी रात्री देखील ते नेहमीप्रमाणे ब्रिजखाली झोपायला गेले होते. ते गाढ झोपेत असताना अभिषेक नावाच्या एका २८ वर्षीय विकृताने त्यांची दगडाने ठेचून हत्या केली. पहाटेच्या सुमारास बेलापूर शहाबाद गावच्या ब्रिजखाली ही घटना घडली.

हा प्रकार परिसरातील काही स्थानिक लोकांनी पाहिला. त्यांनी आरोपीला बेदम मारहाण केली. त्याला जमीनीवर पाडून लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी एका स्थानिकाने हातात दगड घेत, आरोपीच्या डोक्यात घालण्याचा प्रयत्न केला. मात्र इतरांनी त्याला अडवलं. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. आरोपी अभिषेकनं ही हत्या नेमकी कशामुळे केली, याची माहिती अद्याप समोर आली नाही. मात्र हत्येच्या वेळी अभिषेक दारुच्या नशेत होता. नशेत असतानाच त्याने दगडाने ठेचून प्रकाश यांची हत्या केली असावी, अशी शक्यता वर्तवली जातेय.

## दीडशे रुपये चोरणाऱ्यांना विरोध करताना झटापटीत एकाचा मृत्यू, दोन आरोपींना अटक

**अहिल्यानगर :** शिर्डीमध्ये अलीकडेच काही चोरीच्या घटना घडल्या आहेत. यात साई संस्थानच्या दानपेटीतून कर्मचाऱ्यानेच लाखो रुपयांची चोरी केल्याचा प्रकार उघड झाला आहे. तसेच, धूम स्टाईल चोरट्यांनी महिला साईभक्तांच्या सोन्याचे दागिने ओरबाडल्याच्या घटना देखील घडल्या आहेत. शिर्डीत आता केवळ दीडशे रुपयाच्या चोरी प्रकरणात हकनाक एका व्यक्तीचा मृत्यू झाला.

दीडशे रुपये चोरले : मनमाड महामार्ग लागत असलेल्या खंडोबा कॉम्पेक्सजवळ आज पहाटेच्या सुमारास व्यक्ती झोपला होता. तेव्हा दोन अज्ञात व्यक्तींनी त्याचे दीडशे रुपये चोरले. चोरलेले पैसे घेऊन आरोपी जात असताना मृत्यू अज्ञात व्यक्तीनं याला विरोध केला.

## पाकिस्तानमधील गाढवांची चीनमधून प्रचंड मागणी

**कराची :** पाकिस्तानमध्ये गाढवांच्या किमती वाढल्या आहेत. बाजारात एका गाढवाची किंमत २,००,००० रुपयांपर्यंत पोहोचली आहे. कारण, चीनमधून गाढवांची खरेदी करण्याचं प्रमाण आणि मागणी सातत्यानं वाढत आहे.

चीनमध्ये एजियाओच्या औषधाच्या उद्योगात अब्जावधी डॉलर्सची उलाढाल होते. या उद्योगात गाढवाची कातडी तयार करून औषध करण्यात येते. या औषधामुळे उर्जा मिळणे, रोगप्रतिकारक शक्ती वाढविणं असे फायदे मिळत असल्याचा दावा करण्यात येतो. त्यामुळे औषध तयार करण्यासाठी गाढवांची कातडी हा आता जागतिक व्यापार झाला आहे. कारण, त्यांची मागणी पुरवठ्यापेक्षा जास्त आहे, असे कराचीमधील पु-शेंग मेडिकल सेंटर चालवणारे डॉ. प्रोफेसर गुओ जिंग फेंग यांनी सांगितलं.



गाढवाची किंमत मजुरांच्या आवाक्याबाहेर- सर्वात मोठी गाढव बाजारपेठ असलेल्या कराचीमध्ये सर्वात स्वस्त आणि निरोगी गाढवाची किंमत १,५५,००० रुपये आहे. ही किंमत व्यवसायासाठी गाढवावर अवलंबून असलेल्या मजुरांच्या आवाक्याबाहेर आहे. गाढवे हा अनेक उद्योगांचा अविभाज्य भाग आहे. त्यापैकी प्रमुख म्हणजे वीटभट्टी, वाहतूक, शेती, कचरा संकलन आदी कामासाठी गाढवांचा उपयोग होतो. पाकिस्तानमध्ये काम करणाऱ्या गाढवांची संख्या ५.९ दशलक्ष असल्याचा अंदाज आहे. केवळ पाकिस्तानमध्येच नाही तर जागतिक स्तरावरील अहवालानुसार जगभरात सुमारे ५० कोटी गरीब लोक हे घोडे, गाढवे आणि खेचरावर उदरनिर्वासाठी अवलंबून आहेत.

चीनला लाखो गाढवांची गरज- पारंपारिक चिनी औषधांमध्ये वापरल्या जाणाऱ्या तीन टॉप टॉनिकपैकी एजियाओ हे आहे. चीनमध्ये गाढवांच्या कातड्यांची मागणी आहे. गेल्या पाच वर्षात एजियाओ उत्पादनांच्या उत्पादनात १६० टक्के वाढ झाली आहे. ही मागणी पूर्ण करण्यासाठी चीनला लाखो गाढवांच्या कातड्यांची गरज भासत आहे. कराची चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीच्या मते गाढवांचं मांस हराम आहे. त्याचा व्यावसायिक, अनैतिक आणि बेकायदेशीर वापर केला जाणार नाही, याची खात्री करण्यासाठी नियमांचं पालन करणं आवश्यक आहे.

## अमेरिकेने १० टक्के टॅरिफ हटवावा

### भारताची ट्रम्प प्रशासनाकडे मोठी मागणी

**नवी दिल्ली :** ट्रम्प प्रशासनाने २ एप्रिलपासून सर्व देशांमधून होणाऱ्या आयातीवर लादलेला १० टक्के बेसलाइन टॅरिफचा भविष्यातील निर्णय आता भारत-अमेरिका व्यापार कराराच्या प्राथमिक रूपरेषा ठरवणाऱ्या चर्चाचा मुख्य मुद्दा बनला आहे. या प्रकरणाशी संबंधित तज्ज्ञांच्या मते, नवी दिल्ली आणि वॉशिंग्टन यांच्यात सुरू असलेल्या चर्चामध्ये हा विषय महत्त्वाच्या स्वरूपात उभा करण्यात येत आहे.

भारताने अमिरेकेकडे अशी मागणी केली आहे की, केवळ १० टक्के बेसलाइन टॅरिफच नाही तर ९ जुलैपासून लागू होणाऱ्या १६ टक्के अतिरिक्त शुल्कालाही रद्द करण्यात यावे. भारताचा दृष्टिकोन स्पष्ट आहे की, जर अमेरिकेने हे शुल्क हटवले नाही तर भारताला देखील अमेरिकन वस्तूंवर तसाच प्रत्युत्तरात्मक टॅरिफ लादण्याचा अधिकार असेल, अशी भूमिका घेतली आहे.

४ जून रोजी अमेरिकेचे व्यापार प्रतिनिधी ब्रेंडन लिंच यांच्या नेतृत्वाखालील एक उच्चस्तरीय प्रतिनिधी मंडळ दिल्लीमध्ये पोहोचले. दोन्ही देशांमधील या मुद्यावर पाचव्यांदा चर्चा केली जात आहे. ही टीम आता १० जूनपर्यत दिल्लीमध्ये राहणार आहे. तर आधी या भेटीला केवळ दोन





दिवसांची यात्रा मानण्यात आली होती.

याबाबत का वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, ''आदर्श स्थिती अशीच असेल की जेव्हा एक अंतरिम करार होईल, तेव्हाच भारतीय वस्तूंवर लागू असलेला १० टक्के बेसलाइन टॅरिफ आणि ९ जुलैपासून लागणारे १६ टक्के शुल्क एकत्र रद्द केले जावे. अन्यथा भारताला देखील हा अधिकार असेल की तो अमेरिकेच्या वस्तूंवर एकूण २६ टक्के टॅरिफ कायम ठेवू शकतो.''

१३ फेब्रुवारीला वॉशिंग्टनमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकन राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांच्या भेटी आणि संयुक्त निवेदनात 'म्यूच्युअली बेनिफिशियल' आणि 'फेअर ट्रेड टर्म्स' यांची गरज यावर भर दिला गेला होता. त्याच संदर्भात 'मिशन ५००' अंतर्गत वर्ष २०३० पर्यत द्विपक्षीय व्यापार ५०० अब्ज डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठरवण्यात आले आहे.

दरम्यान, दोन्ही देश ९ जुलैपूर्वी एक 'अर्ली हार्वेस्ट डील'ला अंतिम रूप देण्याचा प्रयत्न करत आहेत, ज्यामुळे मोठ्या टॅरिफ लागण्यापूर्वीच काही दिलासा मिळेल. त्यानंतर सप्टेंबर-ऑक्टोबर २०२५ पर्यत पूर्ण द्विपक्षीय व्यापार करार तयार होण्याची शक्यता आहे. याच दरम्यान भारताचे वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल १७ ते २२ मे या काळात अमेरिकेत होते, जिथे त्यांनी आपल्या समकक्ष अमेरिकन वाणिज्य सचिव हॉवर्ड लटनिक आणि यूएस ट्रेड रिप्रेझेंटेटिव्ह जैमीसन ग्रीर यांच्याशी महत्त्वाच्या बैठका घेतल्या. या बैठकींचा परिणाम आता दिल्लीत सुरू असलेल्या चर्चामध्ये स्पष्ट दिसत आहे.

## जगप्रसिद्ध लोणार मध्ये ही जल जीवनचा बट्ट्याबोळ

**– तालुक्यात जल जीवन मिशन योजना अर्धवट – ४५ योजना चे काम प्रगतीपथावर मात्र प्राण्यांची समस्या कायम**


**जगप्रसिद्ध लोणार असं संबोधल्या जाणाऱ्या लोणार तालुक्यातील जलजीवन जलजीवन मिशन योजनेचा बट्ट्याबोळ झाल्याचं एकंदरीत चित्र समोर येत आहे.**

### ६८ योजना पैकी २० योजना अपूर्ण ४५ प्रगतीपथावर

लोणार तालुक्यामध्ये जल जीवन मिशन योजना राबविली जात असून २० पैकी योजना अपूर्ण आहेत. तर ४५ योजना प्रगतीपथावर आहे. मात्र, यामध्ये ३ योजना कुठे गेल्या याचा मेळ नसल्याने संबंधित विभागाचे आकडेवारीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. आकडेवारीचाच जल जीवन मशन योजने च्या अधिकाऱ्यांना माहिती नसेल तर, जलजीव मिशनची काय हाल असेल असा प्रश्न उपस्थित होते आहे.

लोणार . नागरिकांची वर्षानुवर्षांपासून पाण्यासाठी होणारी पायपीट थांबावी, यासाठी केंद्र शासनाच्या वतीने तसेच राज्य शासनाच्या वतीने पाणी समस्या निकाली काढण्यासाठी विविध योजना राबविल्या जात आहेत. मात्र, सदर योजना ह्या केवळ कागदोपत्री राबविल्या जात असल्याने पाण्याची समस्या कायम आहे. लोणार तालुक्यात जलजीवन मिशन योजनेअंतर्गत ६८ योजना राबविण्यात येत आहेत. मात्र, या ६८ पैकी २० योजना ह्या अर्धवट असल्याचे सांगितले जात असून ४५ योजना ह्या प्रगतीपथावर आहेत. यामध्येही तीन योजनेचा मेळ प्रशासनाला लागला नसल्याचे चित्र दिसून येत आहे.

लोणार तालुक्यामध्ये जल जीवन मिशन योजनेअंतर्गत तब्बल ६८ योजना राबविण्यात येत आहेत.या योजनेला दोन वर्षाच्यावर कालावधी होत असतानाही अद्याप जलजीवन मिशन योजनेच्या नळातून पाणी बाहेर पडले नाही.त्यामुळे गावतील पाणी समस्या कायम आहे. शासनाने नागरिकांना विशेष करून मायमाऊल्यांच्या डोक्यावरील हंडा उतरावा व त्यांना शुद्ध व मुबलक पाणी मिळावे, या उदात्त हेतूने जल जीवन मिशन योजना राबवून त्यावर कोट्यावधी रुपयाचा निधी खर्च केला आहे. मात्र, या निधीचा कवडीचाही फायदा जनतेला झाला नसल्याचे चित्र



देविदास खनपटे
मुख्य संपादक

लोणार तालुक्यामध्ये दिसून येत आहे. तालुक्यामध्ये ६८ योजना राबविण्यात येत असल्या तरी यातील वेळेच्या आत एकही योजना पूर्णत्वास गेली नाही ४५ योजना ह्या प्रगतीपथावर असल्याचे दाखवले जात असले तरी प्रत्यक्षात मात्र, गोड बंगाल आहे विषयच नाही अर्धवट दाखवण्यात आले आहेत. मात्र वीस ठिकाणी सदर योजना ही योजनेचे काम अर्धवट झाले असल्याची माहिती आहे. त्यामुळे जल जीवन मिशन योजना ही जनतेच्या हिताची आहे की, अधिकारी पदाधिकाऱ्यांच्या हिताची असा प्रश्न निर्माण झाला आहे. शासन प्रशासनाच्या




दुर्लक्षितपणामुळे सर्वसामान्य नागरिकांची मात्र पाण्याची समस्या कायम असल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे.

CMYK

## जननायक बिरसा मुंडा

आज ९ जून, भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांचा स्मृतिदिन. जननायक बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी रांची जवळील लिहती या खेडेगावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सुगमा मुंडा तर आईचे नाव करमी हातू असे होते. त्यांचे वडील शेतमजूर होते. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांना इंग्रजी माध्यमाच्या चाईबासा इंग्लिश मिशनिरी स्कुलमध्ये शिक्षणाची संधी मिळाली. इंग्रजी शिक्षणामुळे त्यांच्यावर आधुनिक विचारांचा प्रभाव पडला. बिरसा मुंडा हे जरी इंग्रजी शाळेत शिकत असले तरी त्यांना भारतीय संस्कृतीचा अभिमान होता. १८७८ – ७९ मध्ये ब्रिटिशांनी वन कायद्यात बदल केला. या नव्या कायद्यानुसार आदिवासींच्या ताब्यात असलेल्या जंगलांवर ब्रिटिशांची मालकी झाली. या कायद्यामुळे आदिवासींवर बेघर होण्याची वेळ आली. आदिवासींनी उदरनिर्वाहासाठी फळे, कंदमुळे, लाकुडफाटे अथवा जनावरांसाठी चारा तोडल्यास त्यांना शिक्षा होऊ लागली आणि आदिवासींच्या आस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला. या कायद्या विरोधात आदिवासींनी न्यायालयात दाद मागितली पण तिथेही त्यांना न्याय मिळाला नाही. १८८४ साली बिहारमध्ये भीषण दुष्काळ पडला. भीषण दुष्काळ आणि उपासमारीने अनेक लोक मरण पावली. जननायक बिरसा मुंडा यांनी या काळात आदिवासी समाजाची निःस्वार्थ सेवा केली. भीषण दुष्काळात लोक उपासमारीने मरत असताना लोकांप्रति संवेदना व्यक्त करण्याऐवजी जुलमी ब्रिटिश सरकारने अवाजवी शेतसारा आकारला. ब्रिटिशांनी आकारलेल्या अवाजवी शेतसऱ्याला जमीनदार आणि जहागिरदारांनी पाठिंबा दिला त्यामुळे चिडलेल्या बिरसा मुंडा यांनी जनआंदोलन उभारले. हे जनआंदोलन जहागीरदार व जमीनदारांच्या शोषणाविरुद्ध होते. आदिवासी बांधव मोठ्या संख्येने या जनआंदोलनात सहभागी होऊ लागल्याने हे आंदोलन दडपण्यासाठी जहागीरदार आणि जमीनदारांच्या माध्यमातून ब्रिटिशांनी बिरसा मुंडा यांना रोखण्याचा प्रयत्न केला. १८८५ साली बिरसा मुंडा यांना दोन वर्ष कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांना हजारीबागच्या तुरुंगात पाठवण्यात आले. तुरुंगात असतानाच त्यांनी जुलमी ब्रिटिश सरकार उखडून टाकण्याचा संकल्प केला. दोन वर्षांची शिक्षा भोगून आल्यावर त्यांनी आदिवासी समाजाला संघटित करून ब्रिटिश सरकार विरुद्ध लढा पुकारला. १८८७ मध्ये बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजाने ब्रिटिशांविरुद्ध अनेक लढाया करून त्यांना जेरीस आणले. या लढाया त्यांनी पारंपरिक शस्त्रांनी म्हणजे भाले, तलवारी, धनुष्यबाण यांच्या साहाय्याने लढल्या. आदिवासी, दुर्गम, डोंगराळ भागातून पारंपरिक पद्धतीने लढा उभारून त्यांनी ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले. बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखालील आदिवासी समाज आपल्याला दाद देत नाही हे लक्षात आल्यावर ब्रिटिशांनी अतिरीक्त ८ कुमुक मागवली आणि आदिवासींवर हल्ला केला त्यात ४०० आदिवासी बांधव शहीद झाले. तरीही बिरसा मुंडा यांनी हार मानली नाही त्यांनी आपली लढाई चालूच ठेवली. १८९० मध्ये बिरसा मुंडा डोमवाडी पहाडात आदिवासी बांधवांना मार्गदर्शन करत असताना ब्रिटिश सैन्याने त्यांच्यावर हल्ला केला. भीषण लढाई झाली. बिरसा मुंडा यांना अटक करून रांचीच्या कारागृहात त्यांची रवानगी करण्यात आली. २० मे १९०० रोजी त्यांना एकांत कोठडीत ठेवण्यात आले.एकांत कोठडीत जेवण करण्यास त्यांनी नकार दिला त्यामुळे त्यांना अशक्तपणा आला. न्यायालयातच ते बेशुद्ध पडले. त्यांना न्यायालयातून कारागृहात आणण्यात आले औषध उपचार करण्यात आले त्यांची तब्येत सुधारली मात्र ९ जून १९०० रोजी त्यांना रक्ताची उलटी झाली ते बेशुद्ध पडले व त्यातच त्यांची प्राणज्योत माळवली. त्यांचा मृत्यू एशियाटिक कॉलरा या आजाराने झाला असे सरकारच्या वतीने सांगण्यात आले असले तरी त्या आजाराची कोणतेही लक्षणे त्यांच्या शरीरावर दिसत नव्हते त्यामुळेच इतिहासकार ब्रिटिशांनी त्यांची हत्या केली असा संशय व्यक्त करतात. नेपोलियनला जसे आर्सेनिक देऊन ठार मारले तेच लक्षणे बिरसा मुंडा यांच्या शरीरावर दिसत होते शिवाय त्यांना कारागृहातच दफन करून पुरावा नष्ट करण्यात आला. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात जननायक बिरसा मुंडा यांचे योगदान अतुलनीय असे आहे. आदिवासींच्या न्याय हक्कासाठी मोठा लढा उभारून त्यांनी जे महान कार्य केले त्याला तोड नाही त्यामुळेच त्यांना आदिवासी जननायक हा किताब जनतेने बहाल केला. आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग; महाराष्ट्राची भाग्यरेषा



राज्याची प्रगती अधिक गतिमान करण्यात दळणवळण सुविधांची व्यापक उभारणी महत्त्वाची बाब आहे. त्याला प्राधान्य देत शासन नागरिकांच्या प्रवास सुविधेच्या दृष्टीने अनेक प्रकल्प गतीने पूर्ण करत आहे. यामध्ये सर्वात महत्त्वाचा ठरलेला ७०१ कि.मी लांबीचा हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग आता अंतिम टप्प्यासह पूर्णपण सुरु होत आहे.

विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रासह राज्यातील २४ जिल्ह्यांना कलाटणी देणाऱ्या हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या नागपूर ते शिर्डी या ५२० किलोमीटर लांबीच्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दि. ११ डिसेंबर २०२२ रोजी पार पडले. दुसऱ्या टप्याचे अहिल्यानगर जिल्ह्यातील शिर्डी (कोकमठाण) ते नाशिक जिल्ह्यातील भरवीर इंटरचेंज दरम्यान एकुण ८० कि.मी लांबीचे लोकार्पण दि. २६ मे २०२३ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले तर समृद्धी महामार्गाच्या भरवीर इंटरचेंज ते इगतपुरी पर्यंतच्या २५ किमीच्या तिसऱ्या टप्प्याचे लोकार्पण दि. ४ मार्च २०२४ रोजी तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) दादाजी भुसे यांच्या हस्ते झाले होते. एकूण ७०१ कि.मी पैकी ६२५ कि.मी लांबीचा हा महामार्ग सध्या वाहतुकीस सुरु असून आतापर्यंत जवळजवळ २ कोटी वाहनधारकांनी समृद्धी महामार्गाचा वापर केला आहे. आता, समृद्धी महामार्गाची उर्वरित ७६ कि. मी लांबीचे (इगतपुरी ते आमणे) लोकार्पण दि. ०५ जून २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होत आहे.

प्रकल्पाची व्याप्ती

राज्याच्या पाच महसुल विभागाच्या १० जिल्ह्यातील २६ तालुक्यांमधील ३९२ गावांमधुन जाणारा हा सहा पदरी महामार्ग ग्रीन फिल्ड सरेखन आहे. समृद्धी महामार्गामुळे नागपूर, वर्धा, अमरावती, वाशीम, बुलढाणा, जालना, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नाशिक व ठाणे हे १० जिल्हे प्रत्यक्षरीत्या जोडले जातात. तसेच समृद्धी महामार्गामुळे चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, गडचिरोली, यवतमाळ, अकोला, हिंगोली, परभणी, नांदेड, बीड, धुळे, जळगाव, पालघर व रायगड हे १४ जिल्हे अप्रत्यक्षरीत्या जोडले जातात. जुन्या नागपूर मुंबई मार्गावरुन नागपूरहून मुंबईकडे येण्यास १७-१८ तास लागतात. नवीन ''ग्रीनफिल्ड एक्सप्रेसवे'' ने प्रवास ८ तासात करणे शक्य होणार आहे. आता मुंबईतील जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट ते नागपूरस्थित मिहान यांना जोडणाऱ्या या महामार्गामुळे बंदरावरुन जलद वाहतूक करुन आवश्यक माल भारतभर वेळेवर पोहोचवणे शक्य होणार आहे. हा प्रकल्प देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर गुंतवणुकीच्या आधारे राज्यातल्या ग्रामीण भागास महत्वाचा ठरलेला आहे.

हा महामार्ग दिल्ली- मुंबई द्रुतगती मार्ग, जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट आणि शिर्डी, अजिंठा वेरुळ लेणी, लोणार सरोवर आणि इतर पर्यटन स्थळांना जोडणारा आहे. देशाचे ग्रोथ इंजिन असणाऱ्या महाराष्ट्रासाठी हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग ही खऱ्या अर्थाने समृद्धीची भाग्यरेषा ठरणार आहे.

वैशिष्ट्यांनी समृद्ध महामार्ग

राज्य शासनाचा महत्वाकांक्षी प्रकल्प असेलला समृद्धी महामार्ग हा अभियांत्रिकी कौशल्यासह अनेक वैशिष्ट्यानींही समृद्ध असा महामार्ग आहे. दळणवळणाची गतिमान घौडदौड साध्य करत पर्यटन, उद्योग, शेतमालाला कमी वेळेत बाजारपेठेत पोहोचवण्यास सहाय्यक ठरत असलेल्या समृद्धी महामार्गावरुन आतापर्यंत अंदाजे दोन कोटी वाहनांनी प्रवास करत सुखद, रहदारीमुक्त सुलभ, गतिमान प्रवासाचा अनुभव घेतला आहे.

सर्वाधिक लांबी रुंदीचा बोगदा

समृद्धी महामार्गाच्या उर्वरित टप्प्यातील ७६ कि.मी. ची लांबी ही नाशिक व ठाणे या दोन जिल्ह्यात येते. सह्याद्रीच्या पर्वतरांगामधून खडतर मार्ग काढत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने अभियांत्रिकी आव्हान पेलले. या टप्प्यामध्ये एकूण ५ दुहेरी बोगदे असून या बोगद्यांची लांबी १०.७३ कि.मी (दोन्ही मार्गिका मिळून एकूण लांबी २१.४६ कि.मी) आहे. त्यातील पॅकेज १४ (इगतपुरी) येथील बोगदा ८.०० कि.मी लांबीचा असून हा महाराष्ट्रातील सर्वाधिक लांबी व रुंदीचा (१७.६१ मीटर) बोगदा आहे. या बोगद्याची उंची ९.१२ मीटर आहे.

प्रथमच बोगद्यात वापरण्यात येणारी अग्निशमन यंत्रणा

अग्निसुरक्षेसाठी भारतातील कोणत्याही बोगद्यात प्रथमच वापरण्यात येणारी अग्निशमन यंत्रणा इगतपुरीमधील सर्वात लांबीच्या बोगद्यामध्ये बसविण्यात आलेली आहे. या बोगद्यामुळे अंदाजे आठ मिनिटात इगतपुरी ते कसारा हे अंतर पार करता येणार आहे. त्यातून राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ नाशिक महामार्गावरील कसारा घाटाला पर्यायी मार्ग उपलब्ध झाला आहे. त्यामुळे वाहतूक अधिक जलद होणार आहे, कसारा घाटातील वाहतूक अधिक गतीमान होण्यासही त्यामुळे सहाय्य होणार आहे.

सर्वाधिक लांबीचा पूल

भौगालिक परिस्थितीतून मार्ग काढत महामार्गाचे काम पुढे नेत असताना नाशिक व ठाणे या जिल्ह्यातील ७६ किमीच्या डोंगर दऱ्यामुळे व्हायाडक्ट (मोठे पूल) व बोगदे बांधणे हे मोठे जिकरीचे होते. काही ठिकाणी कठीण खडकात ३० ते ४० मीटरपर्यंत खोदकाम करावे लागले. या टप्प्यात एकूण १७ व्हायाडक्ट (मोठे व्हॅली पूल) असून त्याची एकूण लांबी १०.५६ कि.मी (दोन्ही मार्गिका मिळून एकूण लांबी २१.१२ कि.मी) आहे. या टप्प्यात सर्वाधिक लांबीचा पूल (व्हायाडक्ट) २.२८ कि.मी लांबीचा आहे. या टप्प्यात एका ठिकाणी (व्हायाडक्ट-२) पुलाच्या काही खाबांची उंची ८४ मीटरपर्यंत आहे.

इंटरचेंजेस

या टप्प्यात इगतपुरी, खुटघर व आमणे येथे इंटरचेंज येतात. या शेवटच्या टप्यात मोठ्या प्रमाणात विद्युत उच्च तसेच कमी दाबाच्या विद्युत वाहिन्या स्थंलातरित कराव्या लागल्या, त्यामध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितच्या कमी दाबाच्या ६२ वाहिन्या स्थंलातरित करण्यात आलेल्या आहेत, तसेच, टोरेंट पॉवरच्या ५ विद्युत वाहिन्या व पॉवर ग्रीडची १ विद्युत वाहिनी स्थलांतरित करण्यात आलेली आहे. तसेच, या टप्प्यात १ रेल्वे ओलांडणी पुल बांधण्यात आलेला आहे.

पर्यावरण पूरक

प्रकल्पामध्ये वन्यजिव संरक्षणासाठी एकूण १०० बांधकामे पूर्ण झाली असून, त्यांची रचना वन विभागाच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आली आहे. वन्यजीवांच्या वावरासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या ठिकाणी 'ध्वनी रोधक' ची तरतूद करण्यात आली आहे. समृद्धी महामार्गाच्या दुतर्फा ११ लक्ष ३१ हजार झाडे लावण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच या प्रकल्पामध्ये एकूण २०३ मेगा व्हॅट सौर उर्जा निर्मिती प्रस्तावित आहे.

प्रवासातील सुलभता

इगतपुरी ते आमणे (ता. भिवंडी) हा ७६ किमीचा टप्पा वाहतुकीस सुरु झाल्यानंतर ठाणे (आमणे) व नागपूर पर्यंतचा प्रवास आठ तासात करणे सहजतेने शक्य होणार आहे. तसेच ठाणे, मुंबई परिसरातून शिर्डी येथे जाणाऱ्या भाविकांनाही या महामार्गामुळे आपला प्रवास सुलभरित्या व जलदपणे करणे शक्य होणार आहे. त्यासोबतच शिर्डी, अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यातील सिन्नर व इगतपुरी परिसरातील शेतकऱ्यांना आपला शेतमाल सुलभतेने कमी कालावधीत मोठ्या बाजारपेठांपर्यंत पोहोचवता येणार आहे. शेतकरी, उद्योजक, प्रवाश्यांना मुंबई महानगर प्रदेशात कामानिमित्त वरचवेर येणे जाणे हे अधिक सोयीस्कर होणार असून शैक्षणिक, सांस्कृतिक, आरोग्यविषयक संधीचे क्षेत्र विस्तारण्याच्या दृष्टीनेही हा महामार्ग निश्चितच प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या सहाय्यक ठरणारा आहे.

राज्याच्या उपराजधानीला राज्याच्या राजधानीपर्यंत जोडणार नागपूर ते मुंबई दरम्यानचे अतंर अवघ्या आठ तासांवर आणणारा समृद्धी महामार्ग निश्तिच महाराष्ट्राच्या औद्यागिक, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक विकासालाही गतिमान करणारा ठरेल, यात शंका नाही.

**शब्दांकन वंदना थोरात, वारेगावक**
**विभागीय संपर्क अधिकारी**

# युवा भारताच्या सक्षमीसाठी 'पंच-परिवर्तन'

विकसित भारताच्या उज्ज्वल भविष्याचा पाया रचण्यासाठी 'पंच-परिवर्तन' हा एक महत्वाकांक्षी आणि व्यापक उपक्रम म्हणून पुढे येत आहे. या उपक्रमाचा उद्देश समाजातील मूलभूत मूल्यांची पुनर्स्थापना करणे, संस्कृतीचे संवर्धन करणे आणि नव्या पिढीला जबाबदार नागरिक म्हणून घडवणे हा आहे. हा उपक्रम केवळ काही कार्यक्रमांसाठी मर्यादित नसून, भारताच्या सांस्कृतिक पुनर्जागरणाचे एक व्यापक आंदोलन देखील आहे. हीच प्रेरणा घेऊन महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्यावतीने, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून राज्यभरातील १०९७ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये () 'पंच-परिवर्तन' या संकल्पनेवर आधारित विशेष व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे युवकांमध्ये राष्ट्राभिमान, सामाजिक भान, पर्यावरण विषयक सजगता आणि मूल्याधिष्ठित जीवनशैलीची जाणीव निर्माण करणे होय.

'पंच-परिवर्तन' या संकल्पनेचे पाच आधारस्तंभ म्हणजे: नागरिक कर्तव्य व शिष्टाचार, कुटुंब प्रबोधन, स्वदेशी विचार व संकल्पना, सामाजिक समरसता आणि पर्यावरण संरक्षण. हे सर्व स्तंभ एकमेकांशी पूरक असून एकत्रितपणे ते समाजात सशक्त बदल घडवण्याचे सामर्थ्य बाळगतात

पंच-परिवर्तन संकल्पनेचा मूळ गाभा पाच महत्त्वाच्या स्तंभांवर आधारित आहे. सामाजिक समरसता समाज एकसंघ करेल, कुटुंब प्रबोधन कौटुंबिक जागृतीचे कार्य करेल, पर्यावरण संरक्षण देखील महत्त्वाचे आहे, स्वाधारित जीवनशैली आणि नागरिक कर्तव्यबोध आपल्याला कर्तव्यांची जाणीव करून देते, यातील प्रत्येक घटक हा स्वतंत्र असूनही परस्परपूरक आहे आणि यांचा एकत्रित परिणाम म्हणजे राष्ट्रासाठी एक सशक्त सामाजिक अधिष्ठान तयार करणे हा आहे.

भारतीय लोकशाहीचा खरा गाभा फक्त अधिकारांमध्ये नाही, तर जबाबदाऱ्यांच्या जाणिवेत आहे. मतदान करणे, कर भरणे, सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे, कायद्याचे पालन करणे आणि सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग घेणे या गोष्टींमध्ये नागरिकांनी सक्रीय भूमिका निभावली पाहिजे. या माध्यमातून जबाबदार नागरिक घडतील आणि शासन यंत्रणेशी सुसंवाद साधला जाईल. त्याचप्रमाणे भारतीय संस्कृतीत कुटुंब ही एक मूलभूत संस्था आहे. परंतु बदलत्या जीवनशैली, वाढते ताणतणाव आणि पश्चिमीकरणाच्या प्रभावामुळे कुटुंबातील संबंध कमकुवत होत चालले आहेत. या पार्श्वभूमीवर कुटुंब प्रबोधनाच्या माध्यमातून भारतीय मूल्ये, पारंपरिक संस्कार, आदर्श जीवनशैली यांचे पुनरुज्जीवन करण्याचा मानस आहे. पालकत्वाचे भान, वृद्धांचा सन्मान, मुलांमध्ये संस्काराचे बीज आणि कुटुंबातील संवाद वाढवणे हे या प्रबोधनाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

'स्वदेशी' अभियान केवळ उत्पादनापुरते मर्यादित न राहता, जीवनशैलीचा एक भाग व्हावे. स्थानिक संसाधनांचा वापर, पारंपरिक कौशल्यांचे पुनरुज्जीवन, लघु उद्योगांना प्रोत्साहन आणि आत्मनिर्भरतेचा आग्रह यामार्फत भारतीय अर्थव्यवस्था आणि सांस्कृतिक ओळख यांना बळकटी दिली जाते. ही संकल्पना 'वोकल फॉर लोकल' आणि 'मेक इन इंडिया' यांसारख्या केंद्र सरकारच्या धोरणांशी सुसंगत आहे.

सामाजिक समरसता हा पंच-परिवर्तनातील अत्यंत महत्त्वाचा स्तंभ आहे. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात जाती, धर्म, भाषा, लिंग आणि वंश यांवर आधारित भेदभाव काही ठिकाणी जाणवतो. परंतु, समाजात बंधुता, स्नेह, समजूतदारपणा आणि सहकार्य यांची भावना रुजवून, समरसतेच्या आधारे एक संमिश्र पण सुसंस्कृत राष्ट्र निर्माण करता येऊ शकते. सामाजिक समरसता केवळ ऐक्याची भावना निर्माण करत नाही, तर ती देशाच्या सामाजिक आरोग्याचे व सांस्कृतिक प्रगतीचे मूलभूत अधिष्ठान आहे.

पर्यावरणाचा होणारा ऱ्हास, हवामान बदल, पाण्याचे दुर्भिक्ष्य आणि प्रदूषण यामुळे संपूर्ण मानव जातीसमोर एक गंभीर आव्हान निर्माण झाले आहे. पंच-परिवर्तन योजनेत पर्यावरणाच्या रक्षणासाठी वृक्षारोपण, जलसंवर्धन, कचरामुक्त मोहिम, प्लास्टिक मुक्त जीवनशैली यासारख्या विविध जनजागृती उपक्रमांचा समावेश आहे. यामध्ये स्थानिक सहभाग, विद्यार्थ्यांचे योगदान आणि तंत्रज्ञानाचा वापर करून पर्यावरण विषयक जनजागृती



केली जाते.

पंच-परिवर्तन संकल्पना प्रत्यक्ष अमलात आणण्यासाठी विविध स्तरांवर उपक्रम राबवले जात आहेत. त्यातील एक महत्त्वपूर्ण उदाहरण म्हणजे महाराष्ट्रात शिवराज्याभिषेक दिनानिमित्त कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाच्यावतीने आयोजित केलेली व्याख्यानमाला आहे. राज्यातील १०९७ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये () ही व्याख्यानमाला आयोजित करण्यात येत असून, या उपक्रमाचे उद्धाटन मुख्यमंत्री माननीय देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होत आहे. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्राभिमान, सामाजिक जाणीव आणि पर्यावरण सजगता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे. पंच-परिवर्तन संकल्पनेवर आधारित पाचही विषयांवर एकाचवेळी व्याख्याने दिली जाणार आहेत.

या संपूर्ण उपक्रमामध्ये एकात्मता, पारंपरिकतेचा सन्मान आणि आधुनिकतेचा विवेकी स्वीकार यांचा सुरेख संगम पहायला मिळतो. पंच-परिवर्तन ही संकल्पना फक्त वाजवी उपक्रम न राहता, सामान्य माणसाच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवण्यासाठी एक प्रेरणादायी चळवळ ठरणार आहे. भारताच्या सांस्कृतिक पुनर्जागरणाच्या दृष्टीने हा निश्चितच एक निर्णायक उपक्रम ठरणार आहे.

भारत आज एका नव्या जागृतीच्या उंबरठ्यावर उभा आहे. त्यामुळे सामाजिक समरसतेतून ऐक्य, कुटुंब प्रबोधनातून मूल्यसंस्कार, पर्यावरण संरक्षणातून जागरूकता, स्वाधारित जीवनशैलीतून आत्मनिर्भरता आणि नागरिक कर्तव्यबोधातून जबाबदारीची भावना हीच नवभारताची ओळख ठरणार आहे. युवक हे देशाचे भविष्य आहेत. त्यांच्यात राष्ट्रभक्ती, सजग नागरिकत्व आणि सामाजिक उत्तरदायित्वाची भावना रुजवणे हेच या उपक्रमाचे अंतिम ध्येय आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनी प्रेरणा घेऊन, पंच-परिवर्तनाची ही वाटचाल, नवभारताच्या उभारणीसाठी एक तेजस्वी दीपस्तंभ ठरेल. या पंच-परिवर्तनांच्या प्रकाशात चालत, एक सशक्त, संस्कारित आणि स्वाभिमानी भारतीय युवा पिढी घडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करण्याचा संकल्प करूया!

छत्रपती शिवाजी महाराज की जय!

**मंत्री मंगल प्रभात लोढा**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

**हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित**

## संक्षिप्त...

### गोदावरी नदीपात्रात बुडून मायलेकीसह पुतणीचा मृत्यू





**नांदेड/प्रतिनिधी :**नांदेडच्या उमरी तालुक्यातील भायेगाव येथे दुर्दैवी घटना घडली आहे. कपडे धुण्यासाठी गेलेल्या मायलेकीसह एका पुतणीचा गोदावरी नदीपात्रात बुडून मृत्यू झाला आहे. मागासवर्गीय वस्तीवर राहणाऱ्या महानंदा भगवान हणमंते वय ३५ वर्ष, पायल भगवान हणमंते वय १३ वर्ष व ऐश्वर्या मालू हणमंते वय १३ वर्ष अशी मृतांची नावे आहेत. गेल्या पंधरा ते वीस दिवसापासून वस्तीवरील बोरची मोटर जळाल्याने पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. वस्तीवर पण नसल्याने ह्या तिघीजणी कपडे धुण्यासाठी नदीवर गेल्या होत्या. मात्र नदीच्या काठावर मोठ्या प्रमाणात गाळ असल्याने त्यांना पाण्याचा अंदाज आला नाही दुर्दैवाने या तिघीचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे अशी माहितीसमोरयेतआहे. अशी प्राथमिक माहिती समोर येत आहे.

### दंगल सुरु झाल्यामुळे मणिपूरच्या पाच जिल्ह्यांत पाच दिवस इंटरनेट आणि मोबाईल नेटवर्क बंद

इंफाळ : राष्ट्रीय तपास संस्थेने अर्थात एनआयएने मैतेई ग्रुप आरंबाई टेंगोलच्या पाच जणांना अटक केली आहे. यातील एक स्थानिक स्वयंघोषीत कमांडर आहे. ही अटक होणार याचा अंदाज येताच मणिपूरच्या काही भागांमध्ये दंगल करायला सुरुवात झाली. पण सर्वत्र चोख बंदोबस्तामुळे आरोपींना पलायन करणे जमले नाही. अखेर रविवारी ८ जून २०२५ रोजी मध्यरात्री अडीचच्या सुमारास पाचही जणांना अटक करण्यात आली. या अटकेनंतर दंगल आणखी भडकली. दंगलीची तीव्रता वाढू नये म्हणून इंफाळ पश्चिम, इंफाळ पूर्व, थोबुल, बिशनपूर, काकचिंग या पाच जिल्ह्यांमध्ये पाच दिवस इंटरनेट आणि मोबाईल नेटवर्क बंद करण्यात आले आहे.

रात्री भडकलेल्या दंगलीचे पडसाद आंतरराष्ट्रीय सीमेजवळच्या मोरेह पर्यंत दिसून आले. हिंसा आणखी पसरू नये म्हणून सर्वत्र दंगल प्रभावीत सर्व भागांमध्ये संचारबंदी अर्थात कर्फ्यू लागू करण्यात आली आहे. संपूर्ण बिष्णुपुर जिल्ह्यातही संचारबंदी आहे. दंगल करणाऱ्यांनी अटकेतील पाच जणांच्या सुटकेची मागणी करत क्वाकीथेल आणि उरीपोक येथे रस्त्यांवर टायर आणि जुने फर्निचर जाळले. जमाव मोठा असल्याचा आणि वाढत असल्याचा अंदाज येताच सुरक्षा पथकाने हवेत गोळीबार केला. गर्दी हटत नसल्याचे बघून दंगल आटोक्यात आणण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विशिष्ट गोळ्यांचा वापर करण्याचा निर्णय झाला आणि जम ावाच्या दिशेने गोळीबार करण्यात आला.

तेंगोपाल जिल्ह्यातील एका कुकी व्यक्तीच्या अटकेला विरोध करण्यासाठी स्थानिक मोरेहमध्ये रस्त्यांवर आले. पण सुरक्षा पथक घटनास्थळी तातडीने आल्यामुळे हिंसा टळली. आंदोलकांनी अटकेतील व्यक्तीच्या सुटकेची मागणी केली. यामुळे मोरेहमध्ये तणावपूर्ण शांतता आहे. भाजपा खासदार लीशेंबा सनाजाओबा यांनी नागरिकांना शांत रहाण्याचे तसेच कायदा - सुव्यवस्थेचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.

### बिश्नोई टोळीने धमकी दिल्याचा काँग्रेस नेत्याचा दावा

गाझियाबाद: उत्तर प्रदेशमधील गाझियाबादचे प्रापर्टी डीलर आणि काँग्रेस नेते अकबर चौधरी यांनी पोलिसांकडे बिश्नोई टोळीच्या दोन जणांविरोधात तक्रार नोंदवली आहे. बिश्नोई टोळीकडून धमकी आल्याचे अकबर चौधरी सांगत आहेत. या प्रकरणी पोलीस तपास सुरू आहे.



गाझियाबादमधील टीला मोड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पसौंडा गावातील ईदगाह रोडवर अकबर चौधरी राहतात. अकबर चौधरी हे काँग्रेसच्या अल्पसंख्याक विभागाचे सरचिटणीस अर्थात प्रदेश महासचिव आहेत. अकबर चौधरींनी पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार त्यांना ६ जून रोजी सकाळी ११ वाजता मोबाईलवर एका अनोळखी नंबरवरून फोन आला. फोन करणारा स्वत:ला दक्ष चौधरी आणि अनु चौधरी यांचा मित्र सांगत होता. त्याने मी लॉरेंस बिश्नोई टोळीचा सदस्य आहे, असंही सांगितलं आणि जीवे मारण्याची धमकी दिली. इन्स्टाग्रामवर शेखर शर्मा नावाच्या व्यक्तीनेही जीवे मारण्याची धमकी दिल्याचे अकबर चौधरींनी पोलिसांना सांगितले. या प्रकरणी पोलीस दक्ष चौधरी, अनु चौधरी आणि शेखर शर्मा नावाच्या व्यक्तींना शोधत आहेत. ज्या नंबरवरुन फोन आल्याचे अकबर चौधरी म्हणाले त्या नंबर बाबतची चौकशी सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# सीएनजी कारने घेतला अचानक पेट, कार जळून खाक



**दैनिक आपला विदर्भ**

**जालना/प्रतिनिधी :** जालन्यातील हसनाबाद जवळच्या खादगाव फाट्यावर सीएनजी कार आगीत जळून भस्मसात झाली. अचानक लागलेल्या आगीमुळे कारने पेट घेतला. या घटनेत कार पूर्णपणे जळून खाक झाली. कारला आग कशामुळे लागली, याचं नेमकं कारण मात्र समोर आलेलं नाही. कारने जेव्हा पेट घेतला, तेव्हा कारमालकाने अनेक वेळा अग्निशमन दलाला फोन केला. मात्र अग्निशमन दल घटनास्थळी न पोहचल्यानं कार जळून खाक झाली आहे.

## दोन्ही भाऊ एकत्र येऊन महायुतीला धडा शिकवणार: माजी खासदार चंद्रकांत खैरे

**दैनिक आपला विदर्भ**



**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे व मनसे प्रमुख राज ठाकरे हे दोन्ही भाऊ एकत्र येण्यासाठी नातेवाईक सुद्धा प्रयत्न करत आहेत. याबाबत अनिल परब यांच्यावर जबाबदारी आहे. मराठवाड्यात पदाधिकारी म्हणतात, दोन्ही भाऊ एकत्र आले पाहजे. दोन्ही भाऊ महायुतीला धडा शिकवतील. असे मत माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले. ते पुढे म्हणाले की, प्रकाश महाजन यांना बोलू नये, असे आदेश आहे. अस असेल तरी ते काही तरी बोलत असतात. कीर्तीकर उद्धव, आदित्य ठाकरे यांना त्रास देतात. आम्हाला एकनिष्ठ पाहिजे. गजानन कीर्तीकर बोलले असतील, कारण त्यांचा मुलगा आमच्याकडे आहे. त्यांना तिकडे जाऊन पश्चात्ताप होत आहे. शिंदे गटाची परिस्थिती काही दिवसात वाईट होईल. चंदू मामा दोन्ही भावांना एकत्र आणण्यासाठी प्रयत्न करत आहे. राहुल गांधी अॅक्टिव्ह झाले आहेत. बिहार निवडणुकात महाराष्ट्रासारख होऊ नये, यासाठी प्रयत्न करत आहे. ते अभ्यास करून बोलत आहे. नारायण राणे यांचे पुत्र यांनी भाजप संपवण्याचा घाट केला आहे. त्यांना शिस्त नाही. त्यांच्याकडे लक्ष द्यायला नको, ते घाणेरड बोलत आहे. थांबा तुम्हालाच आम्ही जेलमध्ये टाकणार आहे. यांचे खूप प्रकरण आहे, हेच जेलमध्ये जाणार आहे. अमोल मिटकरी यांना दोन्ही भाऊ एकत्र येत असल्याने उकळी फुटत आहे. अशी टीका शिवसेना ठाकरे गटाचे नेते तथा माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी माध्यमांशी बोलताना केली.

### मुंबईही असुरक्षित? तलवारी-कुऱ्हाडींचा कहर! घरात घुसून वृद्ध महिलेसह चौघांवर हल्ला

**मुंबई/प्रतिनिधी :** सुरक्षित समजल्या मुंबईत रात्रीच्या सुमारास काही गुंडानी धुमाकूळ घातला. तलवारी, कुऱ्हाडीसह गुंडांनी एका कुटुंबातील सदस्यांवर हल्ला केला असल्याची घटना समोर आली आहे. गुंडांनी परिसरात लावलेल्या सीसीटीव्हीची तोडफोड करण्याचा प्रयत्न केला. एका जुन्या वादातून हा हल्ला करण्यात आल्याचे म्हटले जात आहे.

माटुंगा परिसरात काल (७ जून) रात्री उशिरा भीषण गुन्हेगारी घटना घडली. तलवारी आणि कुऱ्हाडीने सुसज्ज असलेल्या गुंडांच्या टोळक्याने सार्वजनिक ठिकाणी थेट हल्ला चढवला. यामध्ये काही पुरुष आणि महिलांना गंभीर दुखापत झाली असून, या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

ही संपूर्ण घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅम ेऱ्यात कैद झाली आहे. सीसीटीव्ही फूटेजनुसार काही गुंड मोठ्या निर्धास्तपणे हातात तलवारी, लोखंडी रॉड आणि कुऱ्हाडी घेऊन फिरत असल्याचे दिसून आले. यावेळी एका घरावर त्यांनी हल्ला केला असल्याचे सीसीटीव्हीमध्ये दिसून आले आहे. त्याशिवाय, एका ठिकाणी गुंडांनी सीसीटीव्ही फोडण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिसून आले.

गुंडाच्या मारहाणीत जखमी झालेल्या एका वृद्धेसह चौघांना रुग्णालयात उपचारासाठी लोकमान्य टिळक रुग्णालयात दाखल करण्यात आले. पीडित कुटुंबाचा आणि गुंडांचा २३ मे रोजी एक वाद झाला होता. या वादाचा राग मनात ठेवत हल्ला झाला.

गुंडांनी हल्ला केल्यानंतर पीडितांनी पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला फोन करत हल्ल्याची माहिती दिली. त्यानंतर पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहचले. मात्र, गुंडांनी घटनास्थळावरून पळ काढला. या प्रकरणी पोलिसांनी एका महिलेच्या तक्रारीवरून एफआयआर दाखल केला आहे. दिलीप जंगली, देवा जंगली, फिलीप, वसीमलाला, प्रसाद सपकाळ, राजू जंगली, अँथनी जंगली आणि इतरांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बेकायदेशीर रजिस्ट्री, जिल्हाधिकारी कर्डिलेंचा दणका; नांदेडमध्ये दुय्यम निबंधक तत्काळ निलंबित

**दैनिक आपला विदर्भ**

**नांदेड/प्रतिनिधी :** राज्यातील प्रत्येक तालुक्यात आणि जिल्ह्यात जागेची खरेदी-विक्री करण्यासाठी निबंधक कार्यालयात नागरिकांची मोठी गर्दी असते. जागेची खरेदी विक्री हा मोठा आणि तितकाच गंभीर विषय असल्याने या विभागावर पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते व वरिष्ठ अधिकाऱ्यांची देखील करडी नजर असते. मात्र, तरीही या विभागात सातत्याने गैरप्रकार होत असल्याचं अनेकदा पाहायला मिळते. येथील कार्यालयात एजंटगिरी फोफोवल्याचं दिसून येतं, तर या एजंटगिरीला निबंधक महोदयांचेच पाठबळ असल्याचही समोर आलं आहे. आता, नांदेड जिल्ह्याच्या हदगाव येथील निबंधकांनी गैरमार्गाचा वापर करुन तब्बल १९० पेक्षा जास्त कागदपत्रांची नोंदणी चुकीच्या व गैरप्रकाराने केल्याचं सम ोर आलं. त्यानंतर, नांदेडच्या जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दणका देत निबंधकांचे तत्काळ निलंबन केले आहे. आपल्या प्रामाणिक अन् तत्पर कामकाजाबद्दल कर्डिले यांचा प्रशासनात वेगळाच दबदबा आहे.



राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हा अंतर्गत कोणत्याही तालुका रजिस्ट्री कार्यालयात कोणत्याही तालुक्याची खरेदी-विक्री रजिस्ट्री करण्याची मुभा दिली आहे. शासनाच्या याच योजनेचा गैरफायदा घेऊन नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यात महिन्याभरात तब्बल १२०० रजिस्ट्री नोंदणी करण्यात आल्या. यातील ९०म रजिस्ट्री हदगाव तालुक्याच्या बाहेरील आहेत. या रजिस्ट्री करताना कोणत्याही नियमाचे पालन केले जात नसल्याचे तपासात उघड झाले. याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी आणि जिल्हा निबंधक यांच्या अहवालावरून हदगाव दुय्यम निबंधक सेवलीकर यांना तात्काळ निलंबित करण्यात आले आहे.

हदगाव दुय्यम निबंधक संदर्भात सातत्याने तक्रारी करण्यात येत होत्या. त्यानंतर, मी सहनिबंधक यांच्या नेतृत्वात एका पथकाने ४०० पेक्षा जास्त कागदपत्रांची तपासणी केली. त्यामध्ये, १९० पेक्षा जास्त कागदपत्रांमध्ये गैरप्रकार, व्यवहार झाल्याचं समोर आल्याने तेथील निबंधकांवर कारवाई करण्यात आली आहे. निबंधक सेवलीकर यांनी अनेक रजिस्ट्री गैरप्रकार करून केल्याचे तपासात उघड झाल्यानंतर त्यांच्यावर तत्काळ कारवाई करण्यात आल्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सांगितले.

कोण आहेत राहुल कर्डिले?

राहुल कर्डिले हे कर्तव्यदक्ष व सर्वसाम ान्यांसाठी तळमळीने काम करणारे अधिकारी असून गैरप्रकार खपवून घेत नसल्याने त्यांची प्रशासनात वेगळी ओळख आहे. विशेष म्हणजे यापूर्वी केवळ महिनाभरात तीन वेळा त्यांची बदली झाली होती. राहुल कर्डिले हे मूळचे अहिल्यानगर जिल्ह्यातील ठाणगावचे. त्याच ठिकाणी त्यांचे प्राथमिक शिक्षण झालं. तर पार्थडीमधील करंजी या गावात त्यांचे माध्यमिक शिक्षण झालं. अहिल्यानगरच्या विखे महाविद्यालयात त्यांनी इंजिनिअरिंगची पदवी घेतली. त्यानंतर त्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली. राहुल कर्डिले यांची म हाराष्ट्र लोकसेवा आयोगातून उपनिबंधक म्हणून निवड झाली. त्या दरम्यान त्यांनी यूपीएससीच्या तीन मुलाखती दिल्या होत्या. पण त्यामध्ये अपयश आलं. मात्र, चौथ्या प्रयत्नात ते देशात ४२२ वा क्रमांक मिळवून उत्तीर्ण झाले आणि महाराष्ट्रामध्ये त्यांना काम करण्याची संधी मिळाली. राहुल कर्डिले यांच्या पत्नी प्रियंका कर्डिले यादेखील उपजिल्हाधिकारी म्हणून सेवा बजावत आहेत.

## लेखाचे उत्तर लेखाने दिले : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :** लेखाचे उत्तर लेखाने दिले आहे, फॅट्स आणि फिगर दिले आहे. त्यामुळे मला असं वाटतं आता तरी राहुल गांधी अशा प्रकारचे बोलणं सोडतील. अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी यांच्यावर केली.




माध्यमांशी बोलताना ते पुढे म्हणाले की, ज्या आरोपांमध्ये तथ्य असेल. पुरावे असतील तिथं योग्य ती कारवाई होईल. आपल्या बजेटच्या नियमांमध्ये शेड्युल कास्ट आणि शेड प्राइजच्या योजना हे त्यांच्या हेड खालीच टाकावे लागतात. त्यामुळे कुठलेही बजेट इकडे वळवलेलं नाही. तो नियम आहे आणि तो आपण समजून घेतला पाहिजे. म्हणून अजितदादा ने आपल्या अर्थसंकल्पाच्या भाषणात आम्ही अधिक तरतूद कशी केली आहे, ते सांगितले आहे. आणि या अगोदर त्याच्या जास्त कशी आहे. ते सुद्धा बजेटच्या भाषणात सांगितलेला आहे. पैसा कुठेही वळवला गेला नाही, त्याच विभागांमध्ये खर्च केला गेला. सामना काय आहे, कोणत सर्टिफिकेट देणारी संस्था आहे का ? हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे असतानाच सामना होता. आता काय ? असा प्रश्न उपस्थित करत सामनावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टीका केली.

# शेतकऱ्यांच्या आत्महत्येच प्रमुख कारण पाणी टंचाई आहे : केंद्रीय मंत्री गडकरी

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र मध्ये शेतकरी आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे. त्यामध्येही विदर्भात हा आकडा प्रचंड मोठा आहे. विशेष करून पश्चिम विदर्भ व इतर काही भागात आत्महत्याचे प्रमाण जास्त आहे.मात्र, या आत्महत्येच प्रमुख कारण हे शेतीसाठी पाणी नाही सुविधा नाही हे आहे. त्यामुळे आता शेतीवर काम करण्याची गरज आहे असे असे मत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केले ते येथे आयोजित पाणी परिषद कार्यक्रम बोलत होते. यावेळी ते म्हणाले की, विदर्भात प्रमुख भागामध्ये एक काम आहे की आपल्या विदर्भामध्ये सिंचनाचा अभाव ही आपली सगळ्यात मोठी समस्या कॉटन प्राइज मेकॅनिझम आणि ज्या आत्महत्या झाल्या. त्या अकोला वाशिम, बुलढाणा, वर्धा, यवतमाळ आणि अमरावतीत. आता प्रत्येक ठिकाणी मोठे मोठे प्रकल्प टाकले पाहिजे अनेक प्रकल्प झाली पाहिजे ही अपेक्षा लोकांची आहे. पण शासनाच्या प्रायोरिटीमध्ये आणि एवढे पैसे देऊन हे काम पूर्ण करणे यात अडचणी आहेत, प्रधानमंत्री स्विचय योजनेमध्ये आणि बळीराजा योजना दोन योजना प्रकल्प होता आणि पश्चिम महाराष्ट्र या सगळ्या प्रकल्पाला त्यावेळी पूर्ण करण्याकरता पैसे दिले आणि मला अतिशय निवडणुकीच्या वेळी मी जेव्हा मराठवाडा आर.आर. पाटील सांगली जिल्ह्यातला आटपाडी या सगळ्या भागांमध्ये पाणी पोचले. तो दुष्काळग्रस्त भाग होता. – आपला जीडीपी ग्रुप मध्ये ५२– ५४ टक्के पर्सेंटेज हे सर्विसचे आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा प्रमुख प्रश्न म्हणजे पाणी टंचाई आहे. गोसेखुर्द प्रकल्प हा ६० कोटीच्या होता आणि आतापर्यंत त्या प्रकल्पावर साडेबारा हजार कोटी रुपये रुपये खर्च झाले. जेव्हा भारत पाकिस्तान वेगळा झाल तीन नद्या पाकिस्तानला मिळाल्या. तीन नद्या भारताला, आता ते जे बाकीच्या नद्याच पाणी बंद आहे.ज्या तीन नद्या आपल्या अधिकाराच्या आहेत ते पाणी आपण पाकिस्तानला सोडतो आणि इकडे पंजाब हरियाणा मध्ये भांडण आहे. कॅनल दुरुस्तीमुळे राजस्थानच्या सात जिल्ह्यांमध्ये पाणी मिळाले. रेल्वे करता बिल्डिंग करता रोड करिता मटेरियल लागत ते महाराष्ट्र सरकारने जीआर काढला कलेक्टर त्यामुळे विनंती केली तर मोठ काम होईल. आता भारत सरकारने एक्सप्रेस ब्लॉक काढलेला आहे. ज्यात शैक्षणिक आर्थिक असा मागासलेला जिल्हा मध्ये वेगळा नियोजन करण्यात येणार आहे. येणारा काळात आपल्याला जैविक खत ऑरगॅनिक मॅन्युअल वापरला पाहिजे जेणेकरून पीक वाढेल. पाणी आलं नाही चालणार शेतकऱ्यांना ड्रिप नि पिकाला पाणी द्यावा लागेल.

विद्यापीठाने यावर शेतकऱ्यांसाठी चांगले उत्पन्नासाठी जनजागृती केली तर शेतकऱ्यांच्या आत्महत्या होणार नाहीत. पाणी आडवा पाणी जिरवा याकरिता विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा, असे आव्हान केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी यावेळी केले.



## विविध वृत्त...

### ज्ञानगंगा अभ्यारण्यात आढळल्या १० पोते दारु व बिअरच्या काचेच्या बाटल्या






दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील ज्ञानगंगा अभ्यारण्यातून जाणाऱ्या बुलढाणा – खामगाव रोडच्या आजूबाजूला फेकलेल्या दारू व बिअर च्या काचेच्या बाटल्या वन्यजीव सोयरे या पर्यावरण मित्रांनी १० पोते जमा केल्या आहेत. पर्यावरण दिनाचे औचित्य साधून वण्यजीव सोयरे ही सामाजिक संघटना २०१६ पासून हा उपक्रम दरवर्षी राबवीत आहे. या अभ्यारण्यात शेकडो हिंस्त्र प्राणी असून ते जंगलात वावरताना त्यांना कुठेही दुःखाप्त होऊ नये या उद्देशाने या सामाजिक संघटनेने हा उपक्रम चालवीला आहे. या दरम्यान संपूर्ण जंगलात फिरून तब्बल १० पोते दारू व बिअरच्या काचेच्या बाटल्या जमा करून अभ्यारण्यातून बाहेर आणल्या आहेत. व हे ज्ञानगंगा अभ्यारण्य काचेच्या बाटल्यातून मुक्त केले असल्याची भावना वन्यजीव सोयरे यांनी व्यक्त करण्यात आली आहे.

### भाजप आणि निवडणूक आयोगाची मॅच फिक्सिंग झालीय- नाना पटोले



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राहुल गांधी यांनी निवडणूक प्रक्रियेवर आक्षेप घेतला त्यावर आता भाजपचे अंधभक्त तुटून पडले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे निवडणूक आयोगाची वकील करीत आहेत का? असा प्रश्न उपस्थित होतोय. भाजप आणि निवडणूक आयोगाची मॅच फिक्सिंग झाल्याचा आरोप नाना पाटोलेयांनीकेलाय.

### महिलांच्या सुरक्षिततेसाठी डायल ११२ बारा सुरु, महिलांनी संकटकाळी ११२ नंबर डायल करावा - गृहराज्यमंत्री डॉ.पंकज भोयर



दैनिक आपला विदर्भ

**वर्धा/प्रतिनिधी :** येणाऱ्या काळामध्ये सर्व महिला भगिनींना मातांना पालकमंत्री डॉक्टर पंकज भोयर यांनी आवाहन केले की त्यांच्यावर आलेल्या कुठल्याही संकटाला घाबरून न जाता जेव्हा कुठे ते अडचणी मध्ये येतात तेव्हा महाराष्ट्र शासनाच्या पोलीस विभागामार्फत सुरू करण्यात आलेल्या ११२ हा नंबर त्यांनी लक्षात ठेवावा. व त्यांच्यावर कुठलीही आपत्ती जनक परिस्थिती संकट आली की निश्चितपणे कोणालाही न घाबरता ११२ नंबर डायल करून आपल्यावर जी समस्या आहे ती त्या फोनवर असलेल्या प्रशासकीय अधिकाऱ्याला सांगावी जेणेकरून महाराष्ट्र शासन महाराष्ट्र प्रशासन आपल्याला त्या ठिकाणी मदत करेल असे आवाहन राज्याचे गृहराज्यमंत्री तथा वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉक्टर पंकज भोयर यांनी दिलेल्या प्रतिक्रियातून केले आहे.

### गॅस टँकरची धडक अन् मिनी बसमधील २९ शिक्षक जखमी;

**रत्नागिरी/प्रतिनिधी :** मुंबई–गोवा महामार्गावर रत्नागिरीतल्या निवळी येथे सकाळी ७.४५ वाजता एलपीजी टँकर आणि मिनी बसचा भीषण अपघात झाला. अपघातामध्ये मिनी बसमधील २९ शिक्षक आणि एक चालक जखमी झाले. यामध्ये १६ महिला आणि १४ पुरुषांचा समावेश आहे. अपघात होताच एलपीजी टँकरमधून गॅस गळती सुरु झाली. या गॅस गळतीमुळे बाव नदी पुलाजवळील घरांना आग लगाली. तसेच अनेक गाड्याही जळून खाक झाल्याची माहिती समोर आली आहे. आजूबाजूच्या परिसरात असणारी आंब्याची कलम देखील जळाली. मुंबई–गोवा महामार्गावरची वाहतूक गेल्या ५ तासांपासून ठप्प आहे. महामार्ग सुरू होण्यासाठी आणखी ३ तास लागू शकतो.

## जळगाव जामोद येथील पंकज देशमुख मृत्यु प्रकरणाची उप विभागीय पोलीस अधिकाऱ्यांना सखोल चौकशीचे आदेश

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** नांदूरा तालुक्यातील निमगांव अनंता मधुकरराव देशमुख यांनी पोलीस स्टेशन जळगांव जामोद येथे तक्रार दिली होती की, ३६ वर्षीय पंकज उत्तमराव देशमुख वय ३६ वर्षे रा. जळगांव जा. याने त्याचे केळीच्या शेतामध्ये सागाच्या झाडाला दुपट्ट्याच्या सहाय्याने गळफास घेवून आत्महत्या केली होती. त्यांनी सरकारी दवाखाना जळगांव जामोद येथे येऊन पाहणी केली असता, डॉक्टरांनी पंकज देशमुख मरण पावल्याचे सांगितले. फिर्यादी यांच्या तक्रारीवरुर पो. स्टे. जळगांव जामोद येथे अकस्मात मृत्यु क्र. २१/२०२५ कलम १९४ भा.ना. सु.सं.–२०२३ प्रमाणे नोंद आहे.

सदर अकस्मात मृत्यु प्रकरणाची पोउपनि, नारायण सरकटे पो.स्टे. जळगांव



जा. यांच्याकडून चौकशी करण्यात येत होती. अकस्मात मृत्यु चौकशीच्या कागदपत्रांची पाहणी केली असता, प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी तातडीने अकस्मात मृत्युची पुढील चौकशी करण्यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी मलकापूर यांना आदेशीत केले आहे. या संदर्भात माहिती देण्यासाठी आज उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांनी पत्रकार परिषद आयोजित केली होती.

### 'सितारे जमीन पर'च्या रिलीजबाबत आमिर खाननं घेतला मोठा निर्णय, ऐकला अमिताभ बच्चन यांचा सल्ला!

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूड चित्रपट थिएटरमध्ये प्रदर्शित झाल्यानंतर काही काळानं ओटीटी प्लॅटफॉर्मवर देखील प्रदर्शित होतात, यामागील काही कारणं म्हणजे अधिक महसूल, प्रेक्षकांपर्यंत व्यापक पोहोच. हा आजच्या काळातला यशस्वी आणि 'संतुलित व्यवसायिक फॉर्म्युला' मानला जातो कारण निर्मात्यांना थिएटर आणि ओटीटी माध्यमांतून मिळकत होते. परंतु सुपरस्टार आमिर खान मात्र या 'संतुलित व्यवसायिक फॉर्म्युल्याला' न जुमानता आपला आगामी चित्रपट 'सितारे जमीन पर' फक्त चित्रपटगृहांतच प्रदर्शित करणार असून त्यावर तो ठाम आहे.

आमिर खाननं घेतला मोठा निर्णय : ओटीटी प्लॅटफॉर्मवरील आकर्षक ऑफर्स नाकारत आमिर खाननं त्याचा बहुप्रतीक्षित चित्रपट 'सितारे जमीन पर' फक्त चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित करण्याचा ठाम निर्णय घेतला आहे. आमिर खाननं हा निर्णय घेताना मोठ्या आर्थिक जोखमीचा सामना करण्याची तयारी दाखवली आहे. या निर्णयामुळे बॉलिवूडमध्ये एक चर्चेचा विषय निर्माण झाला आहे. ''मी चित्रपटांचा निष्ठावंत आहे आणि मला त्यावर विश्वास आहे. हो, यात मोठी आर्थिक जोखीम आहे. जर चित्रपट चालला नाही तर प्रचंड नुकसान होऊ शकतं. पण तरीही मी ओटीटी डील्स नाकारल्या, कारण मला प्रेक्षकांनी थिएटरमध्ये येऊन चित्रपट पाहावा असं वाटतं,'' असं आमिरनं स्पष्टपणे सांगितलं.

## विद्यार्थ्यांनी शिकून, समृध्द होवून देशाच्या प्रगतीला हातभार लावावा : खा. मेधा कुलकर्णी

### ब्राह्मण कल्याण ट्रस्टच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

दैनिक आपला विदर्भ

**धाराशिव/प्रतिनिधी :** विद्यार्थ्यांना कौतूकाची थाप घेताना जवाबदारी पण पेलता आली पाहिजे. शिक्षण हे माणसाला उन्नत करते, विद्यार्थ्यांनी शिकून, समृध्द होवून देशाच्या प्रगतीला हातभार लावावा असे प्रतिपादन खासदार मेधा कुलकर्णी यांनी केले. ब्राह्मण कल्याण ट्रस्ट, धाराशिवच्या वतीने काल शनिवार, ७ जून रोजी येथील परिमल मंगल कार्यालयात आयोजित गुणगौरव सोहळ्यात त्या अध्यक्षस्थानावरुन बोलत होत्या. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून धाराशिवच्या माजी नगराध्यक्ष तथा यशस्वी उद्योजिका डॉ. उर्मिला गजेंद्रगडकर, जेष्ठ लेखीका, निवेदिका अर्पणा कुलकर्णी यांची उपस्थिती होती.



पुढे बोलताना खासदार मेधा कुलकर्णी म्हणाल्या की, विद्यार्थ्यांनी करिअरच्या वाटा निवडताना राजकारण, सैन्यदलाचाही अग्रक्रमाने विचार केला पाहिजे. विद्यार्थ्यांनी सजग राहून आपल्या आजूबाजूला काय घडतय हे डोळे उघडून पाहिले पाहिजे. प्रत्येक जाती, धर्माचा आदर करा मात्र प्रलोभनांना बळी पडू नका, कोणतेही अभ्यासपुर्ण केलेले कार्य हे यशस्वी होतेच, पंखात बळ आणून उंच उडा असे आवाहनही त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना केले.

विद्यार्थ्यांनी त्याच्या आवडीचे क्षेत्र निवडावे म्हणजे त्यात यश मिळते असे डॉ. उर्मिला गजेंद्रगडकर म्हणाल्या. तर समजून उमजून अभ्यास केला तर हा अभ्यास आयुषभर उपयोगी पडतो. आपल्या मुलाला यंत्र बनवण्यापेक्षा चांगला माणूस म्हणून घडवा. आपल्या अपेक्षा मुलांवर लादू नका. त्याला सामाजिक दृष्ट्या सक्षम बनवा. मुलांशी संवाद साधा. त्याना नियोजन कौशल्ये शिकावा, मार्कांच्या गणितावर आयुष्याचे गणित अवलंबुन नसते असे परखड मत अर्पणा कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्येची देवता सरस्वतीच्या प्रतिमेचे पुजन करुन दिपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर पहेलगाम येथे दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या नागरीकांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

या सोहळ्यात १० वी, १२ वी मधील सुमारे ७० गुणवंत विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, गुलाबपुष्प, प्रमाणपत्र देवून सन्मान करण्यात आला. याच कार्यक्रमात ऋगवेद शाखा संहिता परिक्षा पास झाल्याबद्दल पुरोहित वैभव विजयकुमार घुगीकर, अनिरुध्द मुकूंद कुलकर्णी या दोघांचाही मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पुजा गंधोरकर, सुत्रसंचालन डॉ. स्वप्नगंधा कुलकर्णी तर उपस्थितांचे आभार अर्पणा पाठक यांनी मानले. कार्यक्रमासाठी गुणवंत विद्यार्थी, पालक तसेच शहरातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी राष्ट्रगिताने कार्यक्रमाची सांगता झाली.

गुणगौरव सोहळ्याच्या नियोजनाची जवाबदारी यावेळी महिलांना देण्यात आली होती. संघटनेच्या महिलांनी कार्यक्रमाचे चोख नियोजन केले होते. यावेळी उपस्थित मान्यवरासह सर्वांनी महिलांच्या प्रयत्नाचे कौतूक केले.

## शेळगाव आटोळ येथे वाळूची अवैध वाहतूक करणारे २ टिप्पर पकडले

### बुलडाणा एसडीओ शरद पाटील यांची कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातून वाहून जाणारी खडकपूर्णा नदीतून मोठ्या प्रमाणात अवैधरित्य वाळूची तस्करी सुरू आहे. त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असून याचा परिणाम सामान्य जनतेला भोगावे लागत आहे.वाळू तस्करी थांबावी म्हणून जिल्हा प्रशासनातर्फे नियमित कारवाया सुरू आहे. बुलडाणा उपविभागीय अधिकारी शरद पाटील यांनी विशेष मोहीम राबवून स्वतः आपल्या पथकासह चिखली तालुक्यातील शेळगाव आटोळ शिवारात अवैधरित्य रेतीचे वाहतूक करणारे २ टिप्पर शनिवारी सकाळी ७ वाजता पकडले आहे.यामुळे वाळूमाफियां मध्ये खळबळ उडाली आहे.

बुलडाणा जिल्ह्यात मागील २ वर्षापासून एकाही वाळू घाटाचा अधिकृत लिलाव झालेला नाही तरीही बुलडाणा जिल्ह्यातील खडकपूर्णा आणि पूर्णा या दोन प्रमुख नद्यातून लाखो ब्रास वाळूचा अवैधरित्या उत्खनन करण्यात आलेला आहे. हा अवैध उत्खनन थांबवावा म्हणून जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी सर्व उपविभागीय अधिकारी तसेच तहसीलदार यांना कारवाया करण्याचे निर्देश दिलेले आहे. त्यानुसार काल शनिवारी बुलडाणा उपविभागीय अधिकारी शरद पाटील एक पथक घेऊन चिखली तालुक्यात गस्तीवर असताना त्यांनी शेळगाव आटोळ शिवारात २ टिप्पर पकडले. चालकांना रॉयल्टी बाबत विचारपूस केली असता त्यांनी कळवा उडवीची उत्तरे दिली यामुळे हे सिद्ध झाले की



शासनाचा महसूल चोरून वाळूची अवैध वाहतूक केली जात आहे. दोन्ही टिप्पर पकडून चिखली पोलीस ठाण्यात लावले असून या टिप्पर मालकाविरुद्ध दंडात्मक कारवाई प्रास्तावित असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी शरद पाटील यांनी दिली आहे.